# ‘व्यावसायिक यश ग्राहक सेवेवर अवलंबून’

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘ग्राहक सेवेवर व्यवसायाचे यश अवलंबून असते. सस्मित आणि तत्पर ग्राहक सेवा प्रत्येक कर्मचाऱ्याने मनापासून द्यावयास हवी. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावी ग्राहक सेवेसाठी करावा,’ असे मत बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे विभागाचे प्रमुख विलास रवंदे यांनी मांडले.

प्रा. श्याम भुर्के यांनी निर्मिती केलेल्या ‘आनंदाचे एटीएम’ या चित्रफितीचे प्रकाशन रवंदे यांच्या हस्ते नुकतेच झाले. बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसेसच्या संचालिका सुप्रिया लिमये, गीता भुर्के, शरदच्चंद्र पाटणकर, सुजाता हटकर आदी या वेळी उपस्थित होते. ‘प्रत्येकाने नोकरी व्यवसायामध्ये ग्राहकाला सेवा देण्यात आनंद मानला; तर कामाचा कंटाळा येत नाही व आपण सतत आनंद देणारे एटीएम बनतो,’ अशी भावना भुर्के यांनी व्यक्त केली.